नि.ख.क. :- १३/१८
सरकार - वि - राकेश
<u>नि.क :- १४</u>

<u>**सरकारतर्फे साक्षदार क. ०१ यांची साक्ष**</u>
<u>**मी शपथेवर सांगतो की,-**</u>

**नाव - देवराव प्रेमाजी भगत**
**वय - ५४ वर्ष.**
**धंदा - नौकरी**
**पत्ता - पारशिवनी त-पारशिवनी, जिल्हा नागपूर.**

<u>**सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. पी. थोटे**</u>

०१. दिनांक ३१.१०.२०१७ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र दिले होते. आता मला सुचनापत्र दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सुचनापत्र **<u>नि. १५</u>** वर आहे.

०२. पोलिस ठाणे पारशिनी येथे आरोपी हा हवालत मध्ये असतांना पोलिसांनी माझ्या समक्ष एक काडतुस जप्त केली व तसा जप्ती पचंनामा तयार केला. आता मला घटनास्थळ जप्ती पचंनामा दाखविला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ जप्ती पचंनामा **<u>नि. १६</u>** वर आहे. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

<u>**उलटतपास आरोपीसाठी श्री. ए. बी. बोकडे वकील साहेब.**</u>

०३. पोलिसांनी मला सुचनापत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला फोन करून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा अगोदरच तयार करून ठेवला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पचंनामा पोलिस ठाणे पारशिवनी येथे तयार केला. हे म्हणणे

खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मला वाचुन दाखविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा पोलिस हवालत मध्ये होता हे मी खोटे सांगीतले.

०४. मी वन विभागामध्ये शासकीय नौकर आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांना तपासकामी मदत असेल तर मी जात असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी यापुर्वी वनविभागाच्य खटल्यामध्ये साक्षीपुरावा दिला आहे. दिनांक ३१.१०.२०१७ रोजी मी कर्तव्यावर असल्याबाबतचा दस्त पोलिसाना दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
पारशिवनी.

स्वा/-
(सं. दि. वानखेडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
पारशिवनी.

दिंनाक :- ०७/०३/२०१९

DISTRICT COURT NAGPUR